# कार्यालय नगर पंचायत, भिवापूर

## ता. भिवापूर, जिल्हा-नागपूर

Email Id:bhiwapurnagarpanchayat@gmail.com फोन : 07176-232308

क्र. कावि/नपंभि/सा.प्र.वि/लोसेहअ-2015/2025/134 दिनांक 07/02/2025

## नगर पंचायत भिवापूर
## जाहीर प्रसिध्दीकरण

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षक समायोजित लोकसेवा देण्याकरीता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेवुन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोणातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - 2015 दिनांक 28/04/2015 रोजी लागू करण्यात आला आहे. सदर अध्यादेश निर्गमित करण्यामागे सार्वजनिक प्राधिकरणाने पूर्वी असलेल्या सेवा अधिनियमाअंतर्गत अधिसूचित करुन त्याप्रमाणे संबंधित सेवा पूरविणे आवश्यक आहे. त्यामध्ये नगर पंचायत या नागरी स्थानिक संस्थाचा समावेश आहे. नागरी संस्थामार्फत देण्यात येणाऱ्या विविध सेवा सुविधांपैकी नागरीक केंद्र बिंदु मानून, नागरीकांना दैनंदीन जीवनामध्ये सातत्याने आवश्यक असणाऱ्या व ज्या लोकसेवांचा जास्तीत जास्त फायदा घेतलेला आहे. व ज्या सेवा महत्वाच्या आहेत. अशा सेवा अध्यादेशाच्या कलम 3 (अ) नुसार अधिसूचित करण्याबाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.एमसीओ-2015/प्र.क्र.189/नवि-14, दिनांक 23/06/2015 नुसार महाराष्ट्र शासनाने निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णयामध्ये नमुद केल्यानुसार एकुण 71 सेवा स्थानिक प्राधिकरणांनी अध्यादेशाचे कलम 3 (अ) नुसार अधिसूचित करावयाच्या आहेत. परंतू त्यापैकी 05 सेवा या फक्त महानगरपालिका करीता लागू असल्याने तसेच 02 सेवा 02 वेळा शासन निर्णयामध्ये नमुद असल्याने भिवापूर नगर पंचायतीकडून नागरीकांना देण्यात येणाऱ्या सेवांची संख्या 64 इतकी होते. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-2015 कलम 3 अन्वये सदर 64 लोकसेवांची सूची, आवश्यक कागदपत्र, फि, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलिय अधिकारी व व्दितीय अधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे. तरी नगर विकास विभागाने विविध शासन निर्णयाव्दारे विहित केलेल्या सेवांची यादी, https://mahaulb.in/MahaULB/home/ulblist/viewmore;jsessionid=DBF१७D९२७F४D२५५१३९७७D०८७७७०१E०१८ या वेब पोर्टल वर तसेच भिवापूर नगर पंचायतच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

स्वा./-
मुख्याधिकारी
नगर पंचायत भिवापूर